संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# गोव्यात...रात्रीस खेळ चाले

**गोव्यामध्ये** मनोहर पर्रिकर यांच्यानंतर भाजपाला आपली सत्ता टिकवण्याकरीता प्रचंड खटाटोप करावा लागणार आहे आणि त्याची झलक पर्रिकर गेले त्यादिवशी तर पाहायला मिळालीच. शिवाय २७ तारखेच्या मध्यरात्री गोव्यात घडलेले राजकीय नाट्य म्हणजे सत्तेचा तिथे कसा जुगार झाला आहे किंवा कॅसिनो झाला आहे हे दिसून येते. महाराष्ट्र गोमंतकवादी पक्षाचा पाठिंबा घेऊन आपले सरकार वाचवण्यात भाजपाला यश आले. परंतु तिथली राजकीय अस्थिरता इतकी विचित्र स्वरुपाची आहे. एकाच पक्षाचे चार किंवा दोन आमदार केव्हा कसे पक्षांतर करतील याचा काही भरोसा नाही. त्याठिकाणी पक्षांतरविरोधी कायद्याचाही फारसा उपयोग होत नाही. आश्चर्याची गोष्ट अशी आहे की एका रात्रीत महाराष्ट्र गोमंतकवादी पक्षाच्या दोन आमदारांनी थेट भाजपामध्ये उडी मारली. त्यामुळे आता या दोन आमदारांची सत्तेमध्ये वर्णी लावावी लागेल. आणि या पक्षाचे सुदिन ढवळीकर यांची उपमुख्यमंत्रिपदावर केलेली नेमणूकही आता भाजपाला रद्द करावी लागली. थोडक्यात ढवळीकरांना त्या पदावरून रातोरात हटवले गेले आहे. गोव्यामध्ये रात्रीस चालणारा हा खेळ तिथल्या राजकारण्यांना काही स्वस्थ झोप घेऊ देत नाही असे म्हणावे लागते. ज्या विश्वासाने मगोपने भाजपाला पाठिंबा दिला त्या विश्वासाला तडा देण्याचे काम मगोप आणि भाजपा या दोघांकडून एकाचवेळी झाले. जेमतेम चाळीस आमदार असलेल्या या विधीमंडळांमध्ये गोव्याच्या विकासापेक्षा केवळ सत्ता हडपण्याचीच स्पर्धा पाहायला मिळते आणि परिणामी एकाच पक्षातले आमदारसुध्दा एकमेकांवर विश्वास ठेवू शकत नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून गोव्यात हा खेळ चालू आहे. जर एखाद्या राजकीय पक्षाला पूर्ण बहुमत मिळाले नाही किंवा एखाद्या पक्षाला दहाच्या आत जागा मिळाल्या तर त्या पक्षातल्या आमदारांना पक्षांतर करणे अधिक सोपे होते. कारण ज्या पक्षाला बहुमतासाठी काही जागांचीच आवश्यकता असते तो सत्तेचे गाजर दाखवून त्यांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करतो. गोव्यात सर्वप्रथम पर्रिकरांचे सरकार आले तेव्हाही हीच परिस्थिती होती फक्त या पूर्वी एकदाच भाजपाला पूर्ण बहुमत मिळाले त्यामुळे तिथले सरकार टिकून राहिले.

### राजकारणाचा कॅसिनो

छोटी राज्ये निर्माण करीत असताना त्या राज्यांच्या विकासाचे हेतू किंवा उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवले जाते प्रत्यक्षात मात्र या छोट्या राज्यांमध्ये सरकार टिकवून ठेवण्यासाठी मोठा राजकीय घाट घातला जातो. गोव्याची परिस्थिती इतर छोट्या राज्यांपेक्षा आणखीनच बिकट स्वरुपाची आहे. कारण फक्त चाळीस आमदार असलेले देशातले हे एकमेव राज्य आहे,अगदी दिल्लीमध्येसुध्दा आमदारांची संख्या सत्तर आहे. पूर्वी केंद्रशासित असलेल्या या प्रदेशांमध्ये राज्यांची निर्मिती करताना या सत्तेच्या जुगाराचा विचार केला गेलेला दिसत नाही.त्यातूनच हा राजकारणाचा कॅसिनो झाला. गोव्यासारख्या छोट्या राज्यात जेव्हा दहा पक्ष निवडणुकीच्या रिंगणात असतात त्यावेळी मतांचे विभाजन होत राहाते. आणि कोणत्याही पक्षाला बहुमत मिळण्याची शक्यता उरत नाही. भविष्यकाळात गोव्यात तर अशीच अस्थिरता राहील हे स्पष्टपणे दिसून येते. कारण मतदारसंघांचा आकार, मतदारांची संख्या हे सगळेच मर्यादित असल्यामुळे तिथे पाच पन्नास मतांमुळे विजयाचा कौल इकडे तिकडे होऊ शकतो. सत्ताधारी पक्षाची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी हेतुपुरस्सर जास्त उमेदवार उभे केले जातात आणि प्रमुख राजकीय पक्षांचे उमेदवार कमी मताधिक्याने निवडून येतील असाही खेळ केला जातो. केवळ आठ दिवसामध्ये गोव्यात झालेले राजकीय सत्तानाट्य म्हणजे लोकशाही मूल्यांची अप्रतिष्ठा करणारे ठरते. आणि मग असाच प्रकार यापुढेही सुरु राहाण्याची शक्यता वाटू लागते. या ताज्या घडामोडींमध्ये तर मगोपच्या पक्षांतराची खलबते रात्री इतक्या उशिरापर्यंत चालू राहीली की त्याची कोणालाही कल्पना आली नाही. विधानसभा अध्यक्षांना लगोलग पक्षांतराचे पत्र सादर केले गेले. यावरून तिथला सत्तेचा सौदा हा किती महत्वाचा मानला जातो हे स्पष्ट होते. म्हणूनच गोव्याला स्थिर सरकार मिळू शकेल याची कोणीही खात्री देऊ शकत नाही. ही सगळी वाताहात बघितल्यानंतर सर्वसामान्य माणसाचा राजकारणावरचा विश्वास उडायला लागतो. गोव्यात ज्या पक्षाचे वीसपेक्षा जास्त आमदार विजयी होतील तोच पक्ष स्थिर सरकार देऊ शकेल. अन्यथा अस्थिरता ही आता तिथे पाचवीला पूजली आहे असेच म्हणावे लागेल.

### सत्तेची सापशिडी

सत्ता हे उद्दीष्ट नाही किंवा साध्यही नाही. तर ते साधन आहे. अशी वारंवार तात्विक भाषा बोलणाऱ्या भाजपाने गेल्या तीन वर्षामध्ये सत्ता टिकवण्यासाठी जो व्यवहार केला आहे तो अत्यंत दुर्दैवी ठरतो. परंतु राजकारण हे सत्तेसाठीच केले जाते. असा त्याचा निष्कर्ष असल्याने तत्वाची भाषा गैरलागू ठरते. भविष्यात ही परिस्थिती होऊ नये किंवा गोव्यात पाच वर्षे स्थिर सरकार राहावे असे वाटत असेल तर गोव्यासारख्या छोट्या राज्यांसाठी पक्षांतराचा वेगळा कायदा करणे योग्य ठरते. संपूर्ण देशासाठी लागू असलेला हा पक्षांतरविरोधी कायदा तिथे तितकासा प्रभावी ठरत नाही. चाळीस आमदारांमध्ये खेळली जाणारी ही सत्तेची सापशिडी लोकांसाठीदेखील चिंतेचा विषय झाली आहे. गोव्याचे उदाहरण समोर ठेवून खरे तर भारतीय जनता पार्टीनेच पुढाकार घ्यायला हवा होता आणि पर्यायी पक्षांतर विरोधी कायद्याची मागणी करायला हवी होती. परंतु सत्तेचे लोणी ऐनवेळी आपल्याला मटकावता यावे यासाठी अशी गोंधळाची परिस्थिती कायम ठेवली गेलेली दिसते. आता मगोपचे जरी दोन आमदार भाजपात आले असले तरी भाजपाकडे निर्विवाद बहुमत होत नाही इतर आमदारांची मदत घ्यावीच लागते. मग मगोपच्या एका आमदाराला आणि ज्याला उपमुख्यमंत्री म्हणून निवडले गेले त्यालाच बाजूला फेकून भाजपाने काय मिळवले असा प्रश्न निर्माण होतो. वापरा आणि फेका हीच नीती तिथे या पक्षाने अवलंबलेली दिसून येते.